भारत सरकार
विधि, न्याय व कंपनी कार्य मंत्रालय

# औद्योगिक विवाद (बँकव्यवसायी कंपन्या) निर्णय अधिनियम, १९५५

(१९५५ चा अधिनियम क्रमांक ४१)

[१ ऑक्टोबर, १९७७ रोजी अंमलात असल्याप्रमाणे]

# The Industrial Disputes (Banking Companies) Decision Act, 1955

(Act No. 41 of 1955)

[As in force on 1st October, 1977]

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन, यांनी भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले.
१९७८
[किंमत ४० पैसे]

# औद्योगिक विवाद (बँकव्यवसायी कंपन्या) निर्णय अधिनियम, १९५५

## कलमांचा क्रम

प्रास्ताविका

कलमे.

१. संक्षिप्त नाव.

२. व्याख्या.

३. बँक निवाडा आयोगाने शिफारस केलेल्या आपरिवर्तनांच्या अधीनतेने अपील निर्णय परिणामक असावयाचा.

४. निवाड्याचा कालावधी.

५. आपरिवर्तन आदेश विशिष्ट प्रकरणे खेरीजकरून एरव्ही परिणामक नसावयाचा.

६. अडचणींचे निवारण करण्याची शक्ती.

# औद्योगिक विवाद (बँकव्यवसायी कंपन्या) निर्णय अधिनियम, १९५५

## (१९५५ चा अधिनियम क्रमांक ४१)

[२१ ऑक्टोबर १९५५]

**बँक निवाडा आयोगाच्या शिफारशींनुसार दिनांक २८ एप्रिल, १९५४ च्या कामगार अपील अधिकरणाच्या निर्णयात आपरिवर्तन करण्याचा आणि त्यानुसार निवाडा अंमलात आणण्याचा उपबंध करण्यासाठी अधिनियम.**

भारतीय गणराज्याच्या सहाव्या वर्षी संसदेकडून पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :—

संक्षिप्त नाव.

१. या अधिनियमास 'औद्योगिक विवाद (बँकव्यवसायी कंपन्या) निर्णय अधिनियम, १९५५' असे म्हणता येईल.

व्याख्या.

२. या अधिनियमात, संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसेल तर,—

(क) "अपील निर्णय" याचा अर्थ, अखिल भारतीय औद्योगिक अधिकरण (बँक विवाद), मुंबई याच्या निवाड्याविरुद्ध कामगार अपील अधिकरणासमोर दाखल केलेल्या अपीलांच्या बाबतीत त्या अधिकरणाचा २८ एप्रिल १९५४ रोजीचा निर्णय असा आहे;

(ख) "निवाडा" याचा अर्थ, भारत सरकारची श्रम मंत्रालयीन अधिसूचना क्रमांक एस्.आर. ओ. ३५, दिनांक ५ जानेवारी १९५२ याद्वारे घटित केलेले अखिल भारतीय औद्योगिक अधिकरण (बँक विवाद), मुंबई याचा निवाडा असा आहे;

(ग) "बँक निवाडा आयोग" याचा अर्थ, भारत सरकारचा श्रम मंत्रालयीन शासन निर्णय क्रमांक एलआर १००(५६)/५४, दिनांक १७ सप्टेंबर १९५४ यामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या निर्देशित मुद्यांबाबत चौकशी करून त्यावर अहवाल देण्यासाठी भारत सरकारचा श्रम मंत्रालयीन शासन निर्णय क्रमांक एल्आर् १००(९)/५५, दिनांक २५ फेब्रुवारी १९५५ याद्वारे नियुक्त केलेली व्यक्ती असा आहे;

(घ) "आपरिवर्तन आदेश" याचा अर्थ, 'औद्योगिक विवाद (अपील अधिकरण) अधिनियम, १९५०'–कलम १५ खालील अपील निर्णयात आपरिवर्तन करणारा भारत सरकारचा श्रम मंत्रालयीन आदेश क्रमांक एस्.आर्.ओ.२७३२, दिनांक २४ ऑगस्ट १९५४ असा आहे.

बँक निवाडा आयोगाने शिफारस केलेल्या आपरिवर्तनांच्या अधीनतेने अपील निर्णय परिणामक असावयाचा.

३. [१][(१)] जणू काही बँक निवाडा आयोगाच्या २५ जुलै १९५५ च्या अहवालाच्या ११ व्या प्रकरणामध्ये शिफारस केलेली आपरिवर्तने प्रत्यक्षात अपील निर्णयात केलेली असावीत त्याप्रमाणे तो निर्णय परिणामक होईल, आणि याप्रमाणे आपरिवर्तित केलेला अपील निर्णय हा 'औद्योगिक विवाद (अपील अधिकरण) अधिनियम, १९५०' (१९५० चा ४८) याच्या अर्थानुसार अपील अधिकरणाचा निर्णय असेल.

[२][(२) पोटकलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, बँक निवाडा आयोगाच्या अहवालाच्या ११ व्या प्रकरणामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या पूर्वीच्या त्रावणकोर–कोचीन राज्यामध्ये निगमित केलेल्या बँकव्यवसायी कंपनीच्या संबंधी त्या प्रकरणात केलेल्या शिफारशी आपरिवर्तित करण्यात येतील आणि त्या—

(क) साऊथ इंडियन बँक लिमिटेड, त्रिचूर आणि कॅथॉलिक सिरीयन बँक लिमिटेड, त्रिचूर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या 'ग' वर्गीय बँकांच्या संबंधात जणू काही,—

(१) उक्त शिफारशींच्या खंड (१) मध्ये,—

(एक) जणू काही 'ग वर्ग' या शीर्षकाखाली '(आठ) त्रावणकोर बँक' या नोंदीनंतर '(नऊ) साऊथ इंडियन बँक, त्रिचूर' आणि '(दहा) कॅथॉलिक सिरीयन बँक, त्रिचूर' या नोंदी समाविष्ट केलेल्या असाव्यात;

(दोन) जणू काही उपखंड (ख्) खालील (एक) आणि (दोन) या बाबी वगळलेल्या असाव्यात, त्याप्रमाणे १ जानेवारी १९५५ रोजी व तेव्हापासून ;

---

[१] १९५७ चा अधिनियम क्रमांक ४०, कलम २ द्वारे कलम ३ ला त्या कलमाचे पोटकलम (१) असा क्रमांक देण्यात आला.

[२] किता—कलम २ द्वारे घालण्यात आले.

(ख्) पलई सेंट्रल बँक लिमिटेड, पलई आणि त्रावणकोर फॉरवर्ड बँक लिमिटेड, कोट्टयम म्हणून ओळखल्या जाणाऱ्या 'ग' वर्गीय बँका आणि 'घ' वर्गीय बँका यांच्या संबंधात उक्त शिफारशींच्या खंड (१) मधील उपखंड (ख्) खालील (एक्) व (दोन) या बाबी जणू काही वगळलेल्या असाव्यात त्याप्रमाणे १ जानेवारी १९५६ रोजी व तेव्हापासून,

आपरिर्वतित केलेल्या होत्या असे मानण्यात येईल.

(३) पोटकलम (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या बँकव्यवसायी कंपन्यांच्या कर्मचाऱ्यांना त्या पोटकलमाने केलेल्या आपरिवर्तनामुळे प्रदेय होणाऱ्या परिलाभाची थकबाकी खालीलप्रमाणे देण्यात येईल :–

(क्) त्या पोटकलमाच्या खंड (क्) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या बँकव्यवसायी कंपन्यांच्या बाबतीत––

(एक) १९५५ सालाची थकबाकी दोन हप्त्यांत दिली जाईल व त्यापैकी पहिला 'औद्योगिक विवाद (बँकव्यवसायी कंपन्या) निर्णय विशोधन अधिनियम, १९५७' याच्या प्रारंभापासून तीस दिवसांच्या आत आणि दुसरा अशा प्रारंभानंतर सहा महिन्यांच्या आत दिला जाईल; आणि

(दोन) १ जानेवारी १९५६ पासून अशा प्रारंभापर्यंतच्या कालावधीमधील थकबाकी अशा प्रारंभापासून तीस दिवसांच्या आत दिली जाईल;

(ख्) त्या पोटकलमाच्या खंड (ख्) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या बँकव्यवसायी कंपन्यांच्या बाबतीत; १ जानेवारी १९५९ पासून अशा प्रारंभापर्यंतच्या कालावधीतील थकबाकी अशा प्रारंभापासून तीस दिवसांच्या आत दिली जाईल.

(४) या कलमाच्या प्रयोजनार्थ, 'पूर्वीचे त्रावणकोर-कोचीन राज्य' या शब्दप्रयोगाचा अर्थ, १ नोव्हेंबर १९५६ च्या लगतपूर्वी अस्तित्वात होते तसे त्रावणकोर-कोचीन राज्य असा आहे. ]

[१][(५) या कलमाच्या पूर्वगामी उपबंधांत काहीही अंतर्भूत असले तरी, केंद्र शासनास बँक निवाडा आयोगाच्या अहवालाच्या ११ व्या प्रकरणामधील खंड (१) (ङ्) मध्ये शिफारस केल्याप्रमाणे महागाई-भत्त्याचे समायोजन करण्याऐवजी, वेळोवेळी शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे ३१ डिसेंबर १९५७ नंतरच्या कोणत्याही कालावधीकरता त्या कालावधीच्या लगतपूर्वीच्या कोणत्याही कालावधीमधील सरासरी अखिल भारतीय राहणीखर्च निर्देशांकात, १४४ (१९४४=१००) याच्या तुलनेने झालेल्या चढउताराला अनुलक्षून स्वतःला योग्य वाटेल असे त्याचे समायोजन करता येईल ; आणि अशी अधिसूचना काढल्या-नंतर कोणत्याही कालावधीकरता महागाईभत्त्याचे याप्रमाणे केलेले समायोजन त्या आयोगाच्या अहवालाच्या खंड (१) (ङ्) मध्ये शिफारस केल्याप्रमाणे होते असे मानण्यात येईल :

परंतु, याप्रमाणे केलेल्या कोणत्याही समायोजनाचे राहणीखर्च निर्देशांकातील चढउताराशी असलेले गुणोत्तर हे, होईल तेथवर, त्या खंडात शिफारस केलेल्या सूत्रातील महागाईभत्त्याचे समायोजन व राहणी-खर्च निर्देशांकाचे चढउतार यामध्ये दर्शवलेल्या गुणोत्तराइतकेच असेल. ]

निवाड्याचा कालावधी.

४. 'औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७' (१९४७ चा १४) किंवा 'औद्योगिक विवाद (अपील अधिकरण) अधिनियम, १९५०' (१९५० चा ४८) यात काहीही अंतर्भूत असले तरी कलम ३ मध्ये निर्देशित केलेल्या रीतीने अपील अधिकरणाच्या निर्णयाद्वारे आता आपरिवर्तित झालेला असा तो निवाडा ३१ मार्च १९५९ पर्यंत अंमलात असल्याचे चालू राहील.

आपरिवर्तन आदेश विशिष्ट प्रकरणे खेरीजकरून एरव्ही परिणामक नसावयाचा.

५. आपरिवर्तन आदेशाच्या उपबंधांपैकी कोणताही उपबंध कलम ३ मध्ये अंतर्भूत असलेल्या उपबंधांच्या आधारे जेथवर निवाड्याचा भाग बनला असेल तेवढे खेरीजकरून एरव्ही ते उपबंध अंमलात येणार नाहीत किंवा परिणामक होणार नाहीत आणि तसे ते कधी होते असे मानले जाणार नाही.

अडचणींचे निवारण करण्याची शक्ती.

६. (१) जर कलम ३ मध्ये निर्देशित केलेल्या रीतीने अपील अधिकरणाच्या निर्णयाद्वारे आता आपरिर्वतित झालेल्या अशा त्या निवाड्याच्या कोणत्याही उपबंधाच्या निर्वचनाबाबत केंद्र शासनाच्या मते कोणतीही अडचण किंवा शंका उद्भवली असेल तर, केंद्र शासन ज्या बाबतीत अशी अडचण किंवा शंका उद्भवली आहे ती बाब निर्णयासाठी 'औद्योगिक विवाद (अपील अधिकरण) अधिनियम, १९५०' (१९५० चा ४८) याखाली घटित झालेल्या कामगार अपील अधिकरणाच्या एखाद्या सदस्याकडे किंवा याबाबतीत शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे ते विनिर्दिष्ट करील अशा 'औद्योगिक विवाद अधि-नियम, १९४७' (१९४७ चा १४) याखाली घटित झालेल्या औद्योगिक अधिकरणाकडे निर्देशित करील.

(२) ज्या अधिकरणाकडे अशी बाब निर्देशित केलेली आहे ते अधिकरण पक्षकारांना आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी देऊन नंतर, अशा बाबतीत निर्णय देईल आणि त्याचा निर्णय अंतिम असेल व तो अशा सर्व पक्षकारांवर बंधनकारक राहील.

---

[१] १९५८ चा अधिनियम क्रमांक ३८ याच्या कलम २ द्वारे घालण्यात आले.

# THE INDUSTRIAL DISPUTES (BANKING COMPANIES) DECISION ACT, 1955

## औद्योगिक विवाद (बँकव्यवसायी कंपन्या) निर्णय अधिनियम, १९५५

### इंग्रजी-मराठी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| appellate decision | .. अपील निर्णय | .. [ S. 2 (*a*) ] |
| award | .. निवाडा | .. [ S. 2 (*b*) ] |
| Bank Award Commission | .. बँक निवाडा आयोग | .. [ S. 2 (*c*) ] |
| cost of living index | .. राहणीखर्च निर्देशांक | .. [ S. 3 (*5*) ] |
| emoluments | .. परिलाभ | .. [ S. 3 (*3*) ] |
| formula | .. सूत्र | .. [ S. 3 (*5*) ] |
| Labour Appellate Tribunal | .. कामगार अपील अधिकरण | .. [ S. 2 (*a*) ] |
| modification order | .. आपरिवर्तन आदेश | .. [ S. 2 (*d*) ] |
| terms of reference | .. निर्देशित मुद्दे | .. [ S. 2 (*c*) ] |

म. ब. एच् ४८२२-२ (१०५५-४-१९७८)

## औद्योगिक विवाद (बँकव्यवसायी कंपन्या) निर्णय अधिनियम, १९५५

## THE INDUSTRIAL DISPUTES (BANKING COMPANIES) DECISION ACT, 1955

### मराठी–इंग्रजी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| अपील निर्णय | .. appellate decision | .. [ S. 2 (*a*) ] |
| आपरिवर्तन आदेश | .. modification order | .. [ S. 2 (*d*) ] |
| कामगार अपील अधिकरण | .. Labour Appellate Tribunal | .. [ S. 2 (*a*) ] |
| निर्देशित मुद्दे | .. terms of reference | .. [ S. 2 (*c*) ] |
| निवाडा | .. award | .. [ S. 2 (*b*) ] |
| परिलाभ | .. emoluments | .. [ S. 3 (*3*) ] |
| बँक निवाडा आयोग | .. Bank Award Commission | .. [ S. 2 (*c*) ] |
| राहणीखर्च निर्देशांक | .. cost of living index | .. [ S. 3 (*5*) ] |
| सूत्र | .. formula | .. [ S. 3 (*5*) ] |

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई